# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ

## निर्लेखीत यंत्रसामग्रीच्या लिलावा करीता जाहिरात

या संस्थेतील निर्लेखीत करण्यात आलेली विविध विभागातील यंत्रे, उपकरणे व इतर साहित्य यांचा लिलाव करणे करीता दि.१९/१०/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे. विहीत नमुना अर्ज संस्थेतील स्टेशनरी विभागात कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत रु.२,०००/- ( अक्षरी : रु. दोन हजार फक्त, ना परतावा ) भरुन उपलब्ध आहे. अधिक माहिती करीता कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. सदर जाहिरात व अटी व शर्ती संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर www.gcoey.ac.in वर उपलब्ध आहे.

प्राचार्य

Scanned by CamScanner

# निर्लेखीत यंत्रे व उपकरणे लिलाव

## अटी व शर्ती

१. यंत्रे, उपकरणे व इतर साहित्य यांच्या खरेदी करण्याकरीताचा निविदा फॉर्मचा नमुना या कार्यालयामधील स्टेशनरी विभागात रु.२,०००/- ( ना परतावा रक्कम ) भरून कार्यालयीन वेळेत दि.१९/१०/२०२३ पर्यंत उपलब्ध राहील. निविदे सोबत फॉर्मची किंमत रु.२,०००/- ( अक्षरी रु. दोन हजार फक्त ) ची शासकीय पावती जोडणे आवश्यक राहिल.

२. विहित नमुन्यातील प्रपत्रामध्ये व मोहोर बंद असलेली निविदाच स्विकारण्यात येतील.

३. निविदे सोबत अनामत रक्कम ( EMD ) रु.२०,०००/- ( अक्षरी : वीस हजार चा डी.डी. प्राचार्य शासकीय अभियंत्रिकी महाविद्यालय यवतमाळ, यांचे नांवे काढलेला व देय यवतमाळ असलेला ) सोबत जोडण्यात यावा, अन्यथा निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही.

४. निविदे सोबत भंगार खरेदी बाबतची सक्षम अधिकारीव्दारा प्राधिकृत केलेली व वैध असलेली परवाण्याची ( लायसन्स ) छायांकीत प्रत, परवाना धारकाचे पॅन कार्ड, आधार कार्ड, मागील तीन आर्थीक वर्षांचा आयकर भरल्याचा सक्षम प्राधीका-याचा सही असणारे प्रमाणपत्र स्वसाक्षांकीत करुन जोडावे.

५. निविदाधारकांना दि.१७/१०/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत (शासकीय सुटीचे दिवस वगळून) एकवेळ जागेवर प्रत्यक्ष यंत्रे, उपकरणे व इतर साहित्याची पाहणी करण्यास परवानगी आहे. त्यांनी संस्थेचे भांडारपाल यांचेशी संस्थेमधे संपर्क साधावा.

६. आपले मोहोरबंद दरपत्रक निविदा या कार्यालयास दि.१९/१०/२०२३ रोजी ५.००वा. पर्यंत सादर करावे. कार्यालयीन दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

७. जास्तीत जास्त दर नमूद असलेली निविदा मंजूर केल्या जाईल. अश्या निविदाधारकांना संपूर्ण लिलावाची रक्कम त्यांना आदेशीत केल्यानंतर तीन दिवसांत भरावी लागेल. तसेच त्यांनी नमुद संपुर्ण यंत्रे, उपकरणे व इतर साहित्य रकमेचा भरणा करुन स्वयं जावाबदारीवर आदेशाच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत घेवून जाणे बंधनकारक राहिल.

८. जास्तीत जास्त दर असलेल्या निविदाधारकास यंत्रे, उपकरणे व इतर साहित्य विकण्याचे आदेशीत केल्यानंतर निविदाधारकाने सदरील यंत्रे, उपकरणे व इतर साहित्य लिलावाची रक्कम भरली नाही अथवा दिलेल्या मुदतीत साहित्याची उचल केली नाही तर त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

९. लिलावाची रक्कम भरली जावून लिलाव पूर्ण होईपर्यंत अथवा जास्तीत जास्त पंधरा दिवस कोणत्याही निविदाधारकाची अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

१०. निर्लेखीत झालेले यंत्रे, उपकरणे व इतर साहित्य ज्या स्थीतीत आहेत त्या स्थीतीत घेवून जाणे बंधनकारक राहील. तसेच सदरील यंत्रसामग्री फाऊंडेशनमधुन काढणे, त्यांचे विद्युत पुरवठा काढुन, वाहनामध्ये ठेवण्याची सर्व जवाबदारी निविदाधारकाची राहील.

Scanned by CamScanner

११. खरेदीदारास नियमानुसार विक्रीकर व सर्वसाधारणकर त्यांच्या जवाबदारीवर भरावा लागेल.

१२. यंत्रे व उपकरणे यांच्या खरेदीचा लिलावाच्या संपूर्ण रकमेचा दिलेल्या मुदतीत भरणा कार्यालयात केल्या नंतरच साहित्य नेण्याची परवानगी देण्यात येईल. रकमेचा भरणा केल्याची शासकीय पावती देण्यात येईल.

१३. लिलावाची योग्य कींमत न आल्यास कींवा ईतर कोणत्याही कारणास्तव संपूर्ण निविदा प्रक्रीया रद्द करण्याचे सर्व अधिकार व आवश्यकता वाटल्यास सदर अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार संस्था प्रमुख म्हणजेच प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ यांना राहील.

१४. विक्रीसाठी असलेली यंत्रे, उपकरणे व इतर साहित्य संस्थेतील विविध विभागांमध्ये ( कर्मशाळा विभाग, मुलांचे वसतीगृह, रेक्टर निवास, विद्युत विभाग व अणूविद्युत विभाग ई. ) पाहता येईल.

१५. लिलावात मंजूर झालेल्या निविदाधारकास लिलावातील प्रत्येक वस्तु संस्थेच्या बाहेर नेणे बंधनकारक राहील. निविदाधारकास आवश्यक / उपयोगी नसलेल्या वस्तूंची संस्था सांगेल त्याप्रमाणे विल्हेवाट लावणे निविदाधारकास बंधनकारक राहील.

दि.१०/१०/२०२३

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
यवतमाळ.

Scanned by CamScanner